२६/०४/२०२१

**डी. वाय. बिथेल केस मधील निर्णय**

**ॲड. किशोर लुल्ला**

विक्रेत्याने वसूल केलेल्या कराचा भरणा का केला नाही याची फेर तपासणी केल्याशिवाय खरेदीदाराला मिळणारा सेट ऑफ अमान्य करू नये असा अतिशय महत्त्वपूर्ण निकाल डी. वाय. बीथेल इंटरप्राईजेस या केस मध्ये मद्रास उच्च न्यायालयाने दिनांक २४ फेब्रुवारी २०१९ रोजी दिला. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे वस्तू व सेवा कर कायद्या अंतर्गत नोंदीत व्यापाऱ्यांना आशेचा किरण दिसून येत आहे.

अर्जदाराने विक्रेत्याकडून माल खरेदी केलेला होता. कलम १६ प्रमाणे अर्जदाराने त्याच्या विवरणपत्रकामध्ये नियमास अनुसरून सेट ऑफ क्लेम केलेला होता. त्यानंतर शासनास असे लक्षात आले की विक्रेत्याने वसूल केलेल्या कराचा भरणा केलेला नाही. त्याकरिता त्यांनी खरेदीदारास नोटीस बजावून त्याने क्लेम केलेला सेट ऑफ अमान्य केला .अर्जदाराने श्री विनायगा एजन्सिज (60 व्ही एस टी 283) या निकालाचा आधार घेतला. परंतु तो शासनाने अमान्य केला. अर्जदाराने सेंट्रल बोर्ड ऑफ जीएसटी कौन्सिल यांनी प्रसिद्ध केलेली दिनांक ४.५.२०१८ ची प्रेस नोट दाखल केली. या प्रेस नोट मध्ये असे नमूद केले आहे की जर विक्रेत्याने कराचा भरणा केला नाही तर खरेदीदाराने क्लेम केलेला सेट ऑफ रिव्हर्स केला जाणार नाही. सर्व प्रथम विक्रेत्याकडून वसुलीची कारवाई केली जाईल. जर विक्रेता सापडत नसेल किंवा त्याने धंदा बंद केला असेल किंवा विक्रेत्याकडे पुरेशी मालमत्ता नसेल तर अशा काही ठराविकच प्रसंगी खरेदीदाराने क्लेम केलेला सेट ऑफ रिव्हर्स करण्यात येईल.

सदर रिट पिटीशन मध्ये माननीय उच्च न्यायालयाने ऑब्झर्व केले की अर्जदाराला माल मिळाला असला पाहिजे. विक्री बिलामध्ये कराची आकारणी केलेली असली पाहिजे आणि विक्रेत्याने सदर कराचा भरणा सरकार दरबारी केलेला असला पाहिजे. त्यामुळे जर सरकारी तिजोरीत कर भरला गेला नसेल तर ही जबाबदारी विक्रेता किंवा खरेदीदार यापैकी एकाची असली पाहिजे  परंतु सदर केसमध्ये शासनाने विक्रेत्याकडून कर वसुलीची कोणतीही कारवाई केलेली दिसत नाही. हा विषय अतिशय गंभीर असून विक्रेत्या विरुद्ध प्रथम सक्त कारवाई केली पाहिजे. तसेच अर्जदाराच्या विनंतीवरून विक्रेत्याची फेर तपासणी केली पाहिजे. विक्रेत्याचा माल खरेदीदाराकडे पोचला की नाही याची विक्रेत्याकडून फेरतपासणी न करता खरेदीदाराने क्लेम केलेला सेट ऑफ अमान्य करणे हे चुकीचे आहे.

माननीय उच्च न्यायालयाने जीएसटी अधिकाऱ्यांनी दिलेला निकाल रद्द बदल ठरवला.

वरील निकाला बाबतीत आपणास असे म्हणता येईल की बऱ्याच वर्षाने एक चांगला निकाल व्यापाऱ्यांच्या बाजूने लागलेला आहे. त्यामुळे सर्वांनी या निकालाचा आधार घ्यावयास हरकत नाही. सदर निकाल हा रिट पिटीशन असल्यामुळे तो फक्त अर्जदाराच्या केस मध्ये लागू असून इतरांच्या केस मध्ये लागू होणार नाही असे जीएसटी अधिकारी नक्कीच म्हणणार आहेत. कायद्याने त्यांचे म्हणणे जरी बरोबर असले तरी या निकालाचा आधार घेऊन संबंधित केस मध्ये आपले म्हणणे लेखी दाखल करावे आणि प्रोसिडिंग लाइव्ह ठेवाव्यात.

ॲडव्होकेट किशोर लुल्ला